# परिशिष्टे

- कवयित्री मंदा कदम यांची मुलाखत
- वाङ्‌मय संपदा
- संदर्भग्रंथ

# मुलाखत :

**प्रश्न :- लेखनाची स्फुर्ती कशी झाली ? कवित्व हा आपला मनोधर्म आहे याचा शोध तुम्हास केंव्हा लागला ?**

उत्तर :- मराठी आठवीत असल्यापासून मी करण्यास सुरुवात केली. घरात नित्यनियमितपणे चालणाऱ्या भेंड्या, गाणे म्हणने यामुळे एकप्रकारे शब्दांना व्हिदम दिली जायची. पण खऱ्या अर्थाने केशवसुत, बालकवी, रविकरणमंडळाची कविता, मर्ढेकर, पाडगावकर, कुसुमाग्रज या सर्व कवींच्या कवीतांचा विलक्षण प्रभाव माझ्या मनावर झाला आणि मी काव्य लेखनांकडे वळले.

**प्रश्न :- समकालीन कवितेसंबंधी आपण काय सांगाल ?**

उत्तर :- साधारणपणे माझ्या लेखनाची सुरुवात १९७० पासून झाली आहे. परंतु कातरवेळ हा माझा पहिला काव्यसंग्रह तसा उशीराच प्रकाशित झाला तो म्हणजे १९९१ साली. या कालखंडात दलित कविता, मोठ्या प्रमाणात मराठी काव्यप्रवाहात येत होती. तरीही सौंदर्यवादी कवितांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत असे. सौंदर्यानुभूतीमुळे तरल जाणीवांची अभिव्यक्ती करण्याकडे माझा कल जात होता. तरीही काही सामाजिक, कौटुंबिक, अध्यात्मिक जाणीवांची कविता मी लिहिली.

**प्रश्न :- तुमच्या कवितेसंबंधी काय आक्षेप घेतले गेले आहेत काय ? असतील तर त्यावर तुमची प्रतिक्रिया कशी राहिली ?**

उत्तर :- माझी संग्रहातील संपूर्ण कविता भावकविता आहे. त्यामुळे ती अभिव्यक्तीच्या अंगाने जाणारी आहे. तरल जाणीवांची अभिव्यक्ती करण्याकडे माझा संपूर्णत: कल आहे. काव्यावर पूर्णपणे आस्वादक समीक्षा असल्याने कवितेवर आक्षेप घेतला नाही. मराठीतील काही समीक्षकांनी कविता स्वीकारली आहे. श्री पु. भागवत, आनंद यादव, नारायण सुर्वे, अ. मो. मराठे, मधुमंगेश कर्णिक, सुनिता देशपांडे, शिरिष पै, प्रतिमा इंगोले, अनुराधा पोतदार, आसावरी काकडे, इंदिरा संत तसेच लीला दिक्षित, ना. धो. महानोर इत्यादींनी पत्रं पाठवून काव्याबाबत चांगले अभिप्राय दिलेले आहेत.

**प्रश्न :- आपल्या आजवरच्या काव्यप्रवासासंबंधी आपल्याला काय वाटते ?**

**उत्तर :-** काव्यलेखन हा माझा छंदच नाही तो माझा श्वास आहे. लहानपणी गाण्याच्या गाण्याच्या भेंड्या खेळतानाच मी अशी गाण्यांची जमवाजमव करीत असे. पुढे आयुष्यात अनेक प्रकारची झुंज द्यावी लागली तेंव्हा कवितेचा हात हातात आला. संगत सोबत जडली ती तिचीच. ती विरंगुळा म्हणूनही अनुभवली. काव्यलेखन सुरु झाल्यानंतर जवळजवळ तीस वर्षांनी पहिला काव्यसंग्रह 'हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर' या प्रकाशकांनी प्रकाशित केला. त्यानंतर बरोबर दहा वर्षांनी त्याच प्रकाशकांनी हा दुसरा 'साजणवेळा' प्रकाशित केला आहे. प्रकाशनाच्या वाटांची माहिती नव्हती, म्हणून हा विलंब पण पहिल्या 'कातरवेळ' या संग्रहाला कविवर्य कुसुमाग्रज म्हणजे तात्यासाहेबांचे आशीर्वाद लाभले होते. आणि योगायोगाची गोष्ट म्हणजे यशवंतराव मुक्त विद्यापीठातर्फे कुसुम्रजांच्या गौरवार्थ दिला जाणारा 'विशाखा पुरस्कार' प्राप्त झाला. तशी पुरस्कारांविषयीही फारशी माहिती मला नव्हती. पण एवढे खरे की, या पुरस्कारामुळे माझी उमेद वाढली.

**प्रश्न :- आपल्या काव्यलेखनावर कोणाचा प्रभाव आहे ?**

**उत्तर :-** खरं म्हणजे माझी आजी आणि माझे वडील यांना प्रतिभेची देणगी होती. पण परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे ते उजेडात आले नाहीत. त्यांच्यातील काही गुण माझ्यात असावेत. लेखनाच्या बाबतीत मात्र मी पूर्वसूरींचे ऋण मानते. बा. भ. बोरकर, केशवसुत, कुसुमाग्रज, बालकवी, इंदिरासंत, आरतीप्रभू, पु, शि, रेगे, नारायण सुर्वे हे सर्वच माझे आवडते कवीसुहृदय आहेत. उत्कट भावनाशील अभिव्यक्ती मला जिवलग सखी वाटते. वैचारिकता, चिंतनशीलता आणि भावनाशीलता या सर्वांशी माझे नाते आहे. माधव ज्युलियनांचे विरहतरंग कालिदासाचे मेघदूत मला जवळचे वाटते. स्त्रीविषयक जाणीवा, प्रेम, निसर्ग आणि आध्यात्मिकता यात मी रमते. म्हणून जुन्या जाणत्यांच्या अभ्यासातूनच माझी वाट मला गवसली आहे.

**प्रश्न :- कवितेखेरीज अन्य साहित्यप्रकार हाताळावेत असे कधी वाटले का ?**

**उत्तर :-** काही व्यक्तिचित्रे मी लिहीली आहेत आणि कवितेला जवळचा असा 'ललित निबंध' हा प्रकारही मला आवडतो. 'गंधवीणा' हा माझा ललित लेख संग्रह प्रकाशित झालेला आहे. ललितगद्याच्या अंगाने जाणारे प्रवासवर्णन, मेघदूतावरील ललित लेखन आणि मेघदूताचं जातवीवृत्तातलं भाषांतर सध्या प्रकाशनाच्या वाटेवर आहे. ग्रामीण कवितांचं संपादन, प्रा. भैरव कुंभारांच्या मदतीनं केलेलं 'जित्राब' प्रकाशित झालं आहे. ते पुणे, उज्जैन, अमरावती व नांदेड विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्टही झालेलं होतं. ललितलेख हा काव्याचाच गद्य अविष्कार आणि म्हणूनच मला तो जवळचा वाटतो. काव्यात न मावणारा अवकाश त्यात पकडता येतो. बाकीचे साहित्यप्रकार माझ्या पिंडाला जुळणारे नाहीत. मात्र एक रसिक वाचक म्हणून माझं त्यांच्याशी नातं आहे.

**प्रश्न :- निसर्गात रमणारे आपले मन ईश्वरचिंतनातही तितक्याच उत्कटतेने रमते. मग आपण प्राक्ततवादी की परिवर्तनवादी ?**

**उत्तर :-** विश्वातील चिद्शक्तीला मी मानते. विश्व म्हणजेच परमात्मा ही माझी धारणा आहे. निसर्ग हा त्या शक्तीच्या आश्रयाने राहतो. जे जे सुंदर आहे त्या त्या सर्व गोष्टींचा रसिकतेने आस्वाद घ्यावा ही माझी मनोवृत्ती आहे. त्यामुळे कोणत्याही वादाच्या भोवऱ्यात मी पडलेली नाही. जगातील मानवी दु:खांनी मी व्याकुळ होते. त्यात बदल घडणं आवश्यक आहे. जे मला नेहमी वाटतं. 'साजणवेळा' मधील शंकरराव खरांता बद्दलची माझी भावना त्यामुळेच प्रकट झाली.

**प्रश्न :- कवयित्री इंदिरा संतांच्या काव्याची भूमिका आपण पुढे चालवीत आहोत असे आपल्याला वाटते का ?**

**उत्तर :-** आक्कांच्या काव्यांतील विरह-वियोगाची व्याकुळता, सौंदर्यवादी वृत्ती यांच्याशी माझे जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यांनी छेडलेला सूर मी प्राणात गोंदला आहे.

**प्रश्न :- कवयित्री शांता शेळके यांच्याखेरीज एकही कवयित्री मराठी चित्रपटसृष्टीत पाय रावू शकली नाही किंबहुना तिकडे वळलीच नाही. हा दोष चित्रपटसृष्टीचा की निर्मात्यांनी कानाडोळा केला ?**

**उत्तर :-** गीतलेखनात फारशा कवयित्री दिसत नाहीत हे खरे. गीतलेखन मलाही आवडते. कोणी प्रसंगनिर्मिती सांगितली तर गीत नक्की निर्माण होऊ शकेल असा आत्मविश्वास आहे. पण कवितेत जशी उत्स्फूर्तता असते तसे गीताचे नसते. चित्रपटक्षेत्रांचे नेमके दरवाजे कोणते हे मला तरी माहीत नाहीत. चित्रपटसृष्टीलाही पडद्याआडच्या कवयित्री कशा कळाव्यात ?

**प्रश्न :- नादमधुर शब्दरचना, सुंदर प्रतिमांनी नटलेली आपली कविता गेय असूनही तिला स्वरबद्ध करावे असे आपल्याला का वाटले नाही ?**

**उत्तर :-** प्रस्थापित कवींच्या काही सुंदर कविता उत्तम संगीत दिग्दर्शक आणि नामवंत गायक यामुळे सर्वतोमुखी झाल्या हा या माध्यमाचा उपयोगच आहे. कधी कधी सामान्य रचनाही सुंदर चालीमुळे आणि नामवंत गायकांमुळे भाग्यवंत ठरतात. म्हणजे ही एक उत्तम संधी असते. पण ती संधी उपलब्ध व्हावी लागते. माझ्याकडे अशी संधी आलेली नाही. मीही त्यात फारशे लक्ष घातले नाही.

**प्रश्न :- आता अखेरचा प्रश्न. नवोदितांना काय संदेश द्याल ?**

**उत्तर :-** कविता ही साधना आहे. जुन्या जाणत्या कवींचा अभ्यास हवा. गेयतेसाठी छंदशास्त्र अभ्यासावे लागते. नवोदितांच्या जाणीवा खूप प्रगल्भ आहेत ही आनंदाची गोष्ट आहे पण त्यांना अधिक सौंदर्य प्राप्त व्हावे अशी मनापासूनची शुभेच्छा !